## निशाणी क्र.०१ वरील आदेश

अर्जदार वसंतराव पांडूरंग भगत यांनी सदरचा अर्ज ते व गैरअर्जदार क्र. १ शुद्धोधन वसंतराव भगत, क्र. २ स्वर्णमाला प्रदिप गवळी व क्र. ३ मिलींद वसंतराव भगत हे मयत चंद्रप्रभा वसंतराव भगत हिचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार वसंतराव पांडूरंग भगत हे मयत चंद्रप्रभा वसंतराव भगत हिचे पती असून गैरअर्जदार क्र. २ हि मुलगी व क्र. १ व ३ ही मुले आहे.

३. मयत चंद्रप्रभा वसंतराव भगत यांचा मृत्यु दिनांक १६/०६/२०२५ रोजी झालेला आहे. मयत चंद्रप्रभा वसंतराव भगत यांचे वारस दाखल्याची अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व इतर महत्वाचे कामासाठी आवश्यकता लागणार आहे. सबब त्यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस असल्याचा दाखला मिळण्यासाठी त्यांनी प्रस्तूतचा अर्ज केला आहे.

४. अर्जदार क्र.२ यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.१३ कडे, मयत चंद्रप्रभा वसंतराव भगत यांच्या मृत्यू दाखल्याची साक्षांकीत प्रत नि.१४ कडे,अर्जदार व गैरअर्जदार यांच्या आधार ओळखपत्रांची साक्षांकित प्रत नि.क्र.१५ ते १८ कडे दाखल केलेल्या आहेत. अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यास कुणाची हरकत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी स्थानिक वृत्तपत्र "विदर्भ मतदार" मध्ये दि.०५/०२/२०२६ रोजी नोटीस प्रसिध्द करण्यात आली. ती निशाणी १९ कडे आहे, तसेच जाहीरनामा नि.६ प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परंतु मुदतीत अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणीही हरकत घेतली नसल्याचे दिसून आले.

५. गैरअर्जदार क्र. १ प्रकरणात हजर झाले परंतू त्यांनी अर्जदार व

गैरअर्जदार यांच्या नावे वारसप्रमाणपत्र देण्यास हरकत नाही अशी पुरसिस नि.क्र.९ कडे दाखल केली. गैरअर्जदार क्र. २ व ३ यांना नोटिसची बजावणी होवून देखील ते सदर प्रकरणात हजर झाले नाही. करिता त्यांचेविरुद्ध दिनांक १०/०४/२०२६ रोजीच्या नि.क्र.१ वर पारित केलेलया आदेशाप्रमाणे प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले.

६. अर्जदारांचा अर्ज, त्यांचे मयताशी असलेले नाते संबंध, तसेच त्यांनी दाखल केलेले कागदोपत्री पुरावे व शपथपत्र, विचारात घेऊन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आ दे श

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार वसंतराव पांडूरंग भगत, गैरअर्जदार क्र. १ शुद्धोधन वसंतराव भगत, क्र. २ स्वर्णमाला प्रदिप गवळी व क्र. ३ मिलींद वसंतराव भगत हे मयत चंद्रप्रभा वसंतराव भगत यांचे वारस असल्याचा दाखला योग्य ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर त्यांना देण्यात यावा.

३) अर्जदारांनी ज्या कारणासाठी दाखला मागितलेला आहे केवळ त्याच कारणासाठी त्याचा उपयोग करता येईल. वारस दाखल्यान्वये कोणत्याही मिळकतीचा मालकी हक्क ठरवून मिळत नाहीत.

४) सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधिन राहून देण्यात येत आहे.

स्वा/–

**(रोशनी दिपक चौबे)**
प्र. सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
आर्णी

ठिकाण: आर्णी
दिनांक: १७/०७/२०२६